दर सोमवारी प्रकाशीत होणारे वृत्तपत्र

२ रूपये

# प्रविण

डाक परवाना:- L2/RNP/ PNM /W/27/BMT/2011-2013

दि.१७/१/२०११

पृष्ठे ६

संपादक:श्री.विजयकुमार रामचंद्र भिसे बी.ए.एम.एस (पुणे)साठेनगर,कसबा बारामती मोबा :- ९३२५३३०६२४

## सामाजिक बांधीलकीतुन गरजू युवकांसाठी ६ महिन्यांचे प्रशिक्षण वर्ग-डॉ.देवसरकर

बारामती :- येथील विद्या प्रतिष्ठानच्या अभियांत्रीक महाविद्यालयात सामाजिक बांधीलकीतुन गरजू व होतकरु गरीब युवकांसाठी ६ महिन्यांचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले असुन यामध्ये सद्या वेल्डर साठी १५ युवक प्रशिक्षण घेत असुन या युवकांना संस्थेच्या वतीने मोफत (विनाशुल्क) प्रशिक्षण दिले जात असुन या युवकांना मानधनही दिले जात आहे.या युवकांनी प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यावर त्यांना प्रमाणपत्रही दिले जाणार आहे.या प्रशिक्षणामुळे युवकांना स्वावलंबी बनण्यासाठी मदत होईल असा विश्वास देवसरकर यांनी यावेळी व्यत केला.लवकरच संस्थेच्या वतीने इलेक्ट्रीशियन व प्लंबर हे दोन प्रशिक्षण वर्ग सुरु केले जाणार आहेत प्रवेश घेण्यासाठी अटी युवक गरजू व होतकरु असावा व प्रशिक्षण कालावधी पुर्ण करावा लागणार आहे.